# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ३०/१२/२०१७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ३०/१२/२०१७ रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. २६/१२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | उपस्थित सदस्य - | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ३. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ४. | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| ६. | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश | सदस्य |
| ७. | श्री. विरानी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ८. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ९. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १०. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| ११. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १२. | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | सदस्या |
| १३. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

| | गैरहजर सदस्य - | |
|---|---|---|
| १. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| २. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |

**प्र. नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ३०/१२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. **प्रकरण क्र. ४२,** दि. ०५/१२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**सुरेश खंडेलवाल :-**

दि. ०५/१२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अशोक तिवारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४२ :-**

दि. ०५/१२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे

**ठराव क्र. ३९ :-**

दि. ०५/१२/२०१७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल      अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मुर्धा ते उत्तन "बाजार फी" वसुलीचा -ऑक्शन पध्दतीने लिलाव करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०५/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.१०)

जुबेर इनामदार :-

सभापती महोदय हा विषय मिरा भाईंदर शहराचा फार मोठा विषय आहे. कचरा उचलले जात नाही. आरोग्य विभागाचे उपआयुक्त आणि संबधित अधिकाऱ्यांना बोलावून घ्या. ह्या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे. कचरा उचलला जात नाही म्हणून लोकांनी संप केला आहे.

मा. सभापती :-

स्वच्छ सर्वेक्षण भारत अभियान चालू आहे. तिकडे गेले आहेत. आयुक्त, उप-आयुक्त, पानपट्टे साहेब त्याच्यामुळे ते मिटींगला हजर राहू शकले नाही.

जुबेर इनामदार :-

स्वच्छ भारत अभियान हा आरोग्याचा मुख्य विषय होता कुठल्याही वस्तुस्थितीत संबंधित अधिकारी हजर पाहिजे होते. पाच दिवस संप चालू होता. आता निकाल लागला आहे. मिरा भाईंदर मधला कचरा उचलणे हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्याच्यामुळे या विषयावर निर्णय करु शकता का? हिवाळा असल्यामुळे मच्छराचे प्रमाण वाढला आहे. त्याप्रमाणे औषधाची फवारणी करणारी लोक वाढवली पाहिजे आणि कामगार ताबडतोब कामाला लागली पाहिजे आणि याच्यावर शासनाने विचार केला पाहिजे.

मा. सभापती :-

त्याचा संप त्यांनी मागे घेतला आहे. आयुक्त, उपायुक्त हे तिथेच गेले आहेत त्याच्यामुळे ते मिटींगला हजर राहू शकले नाही. परिवहन विभागाची टीमने संप पुकारला आहे. त्या कर्मचाऱ्यांना पगार दिला नाही. फरक दिला नाही त्याच्यामुळे त्यांनी संप केला होता. आता मागे घेतला आहे. स्वच्छ सर्वेक्षण ही टीम नियुक्त केली आहे. प्रशासनाने आम्हाला हा विषय लवकरच निकाली काढू असे सांगितले आहे.

जुबेर इनामदार :-

सर्व अधिकारी आले नाही तर हा महत्वाचा विषय आहे. तर याच्यावर रुलींग कोण देईल.

सुभाष निपाणी :-

ह्या संदर्भात विषयावर चर्चा झालीच आहे. पाहणी झालेली नाही.

जुबेर इनामदार :-

प्रशासनाची ही भुमिका आहे. जे ठोकमानधनावर कर्मचारी आहेत त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. निकाल लागलेला नाही ठोक मानधनावर कर्मचारी देणार आहेत. महानगरपालिका यांचे गांभिर्य का घेतले नाही. ऑडीटर साहेब ठोकमानधनावर कर्मचारी घेण्याचा ठेका निश्चित होता आणि आपल्याला कर्मचाऱ्यांची गरज आहे.

स्वाती देशपांडे :-

टेंडर झालेल आहे मुदतवाढीचे.

अनिता पाटील :-

सर्व अधिकारी मिटींगला आले नाहीत. निर्णय घेणार कोण तुम्ही आमचे प्रश्नाचे वरती निर्णय घेऊ शकता का?

दिपक खांबित :-

तुमची भावना कमिशनरपर्यंत पोहोचू.

प्रशांत दळवी :-

सभापती महोदय, ह्या विषय सर्व सदस्यांची भावना आहे. माझे वैयक्तिक असे मत आहे की सर्व अधिकाऱ्यांना अजेंडा दिलेला असतो. मिटींग आहे म्हणून मिटींगला सर्व विभाग प्रमुख, सर्व समितीचे प्रभाग अधिकारी ह्या सर्वांनी मिटींगला असणे गरजेचे आहे. जर मिटींगला अधिकारी उपस्थित नसले तरी मिटींग लावण्यात येऊ नये.

मा. सभापती :-

मी रात्रीच बोललो होतो आयुक्तांशी त्यांनी मला सांगितले होते मिटींगला हजर राहणार नाही संप असल्याकारणाने. पण पुढच्या मिटींगमध्ये विभाग प्रमुख आणि प्रभाग अधिकारी आणि सर्व अधिकारी हजर राहतील.

जुबेर इनामदार :-

विषय निकडीचा आहे शहरामध्ये मोहीम चालवली जात आहे. स्वच्छ भारत अभियान सर्वेक्षण त्याबरोबरच मालमत्ता कर विषयी कर वसुली त्यांचे कर्मचाऱ्यांना आदेश देण्यात आलेत. वसुली करणे योग्य आहे. पण एखाद्या इमारतीमध्ये दोन तीन लोकांनी कर भरला नसेल तर संपूर्ण इमारतीचे कचरा उचलायचा नाही. मिरा भाईंदर शहरामध्ये मालमत्ता जास्त असते तरी सुध्दा लोक कर भरतात. शंभर टक्के इमारती

**असल्या तरी ७०१ टक्के प्रमाणात लोकांचे ते पूर्णपणे स्पष्ट होत नाही. जे कर भरत नाही त्यांचेच पाणी कनेक्शन कट करायचे किंवा त्यांचाही कचरा उचलायचा नाही. पण जे काही सर्व इमारतीचे लोक कर भरतात त्यांचा कचरा उचलला गेला पाहिजे.**

**मा. सभापती :-**

**मोघम आदेश दिले. कचरा उचलणे ही बाब महत्वाचे आहेत. आता स्वच्छ भारत सर्वेक्षण ह्या ॲपद्वारे स्वच्छतेचे काम झपाट्याने चालू आहे. आणि कर आकारणी संदर्भात आमचे आदेश आहेत.**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र ४३,** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मुर्धा ते उत्तन "बाजार फी" वसुलीचा -ऑक्शन पध्दतीने लिलाव करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०५/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.१०)

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बाजार वसुली करीता मुर्धा ते उत्तन विभागाच्या बाजार वसुलीचा ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव करणे करीता दि. २४/०६/२०१७ रोजी दै. महाराष्ट्र सम्राट व साप्ताहिक पहिली खबर वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने मुर्धा ते उत्तन टेंडर आय डी 2017_UDDM_105 करीता खालील ठेकेदारांनी दि.०७/०७/२०१७ रोजी घेण्यात आलेल्या ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव प्रक्रियेत खालील नमुद बिडर्सने भाग घेतलेला आहे.

| अ.क्र. | Tender Id | Bid Count | बिडर्सची यांची नावे | विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | 2017_ UDDM_105 | 03 | १) अमरसिंग जाधव<br>२) साईराज कंन्स्ट्रक्शन<br>३) श्री गजानन इंटरप्राईजेस | मुर्धा ते उत्तन |

सदर लिलाव प्रक्रियेत सर्वात जास्त बोली (देकार) रक्कम खालील बिडर्सची प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नाव / किमान देकार रक्कम | ठेकेदाराचे नाव (बिडर्स) | सर्वात जास्त बोली रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मुर्धा ते उत्तन<br>१२,३७,०९३/- | श्री गजानन इंटरप्राईजेस | रु. १२,९७,०९३/- |

वरील प्रमाणे मुर्धा तु उत्तन विभागाकरीता श्री गजानन इंटरप्राईजेस यांची रू. १२,९७,०२३/- ही सर्वात जास्त दाराची बोली प्राप्त झालेली असुन सदर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा या महापालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराच्या असल्याने सदर बाजार लिलावाची बोली (देकार) रक्कम मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या मान्यतेनुसार स्विकारण्यास, ही सभा मंजूरी देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. सभापती :-**

**ठराव सर्वानुमते आहे.**

**प्रकरण क्र. ४३ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मुर्धा ते उत्तन "बाजार फी" वसुलीचा -ऑक्शन पध्दतीने लिलाव करणेबाबत.** (मा. स्थायी समिती सभा दि. ०५/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.१०)

**ठराव क्र. ४० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बाजार वसुली करीता मुर्धा ते उत्तन विभागाच्या बाजार वसुलीचा ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव करणे करीता दि. २४/०६/२०१७ रोजी दै. महाराष्ट्र सम्राट व साप्ताहिक पहिली खबर वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने मुर्धा ते उत्तन टेंडर आय डी 2017_UDDM_105 करीता खालील ठेकेदारांनी दि.०७/०७/२०१७ रोजी घेण्यात आलेल्या ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव प्रक्रियेत खालील नमुद बिडर्सने भाग घेतलेला आहे.

| अ.क्र. | Tender Id | Bid Count | बिडर्सची यांची नावे | विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | 2017_ UDDM_105 | 03 | १) अमरसिंग जाधव<br>२) साईराज कंन्स्ट्रक्शन<br>३) श्री गजानन इंटरप्राईजेस | मुर्धा ते उत्तन |

सदर लिलाव प्रक्रियेत सर्वात जास्त बोली (देकार) रक्कम खालील बिडर्सची प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नाव / | ठेकेदाराचे नाव (बिडर्स) | सर्वात जास्त बोली रक्कम |
|---|---|---|---|

| | किमान देकार रक्कम | | |
|---|---|---|---|
| १. | मुर्धा ते उत्तन<br>१२,३७,०९३/- | श्री गजानन इंटरप्राईजेस | रु. १२,९७,०९३/- |

वरील प्रमाणे मुर्धा तु उत्तन विभागाकरीता श्री गजानन इंटरप्राईजेस यांची रू. १२,९७,०२३/- ही सर्वात जास्त दाराची बोली प्राप्त झालेली असुन सदर बोलीतील प्राप्त झालेल्या रक्कमा या महापालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराच्या असल्याने सदर बाजार लिलावाची बोली (देकार) रक्कम मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या मान्यतेनुसार स्विकारण्यास, ही सभा मंजूरी देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ४४,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३१(१)(a)(b) नुसार "मलप्रवाह कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.३०)

**प्रशांत दळवी :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम १३१(१)(a)(b) तरतुदीनुसार ''मलप्रवाह कर'' लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे.

केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम अंतर्गत मिरा भाईंदर शहराकरीता भुयारी गटार योजना मंजूर केली असून या प्रकल्पाचा खर्च रु. ४९१.९६ कोटी आहे. प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून योजनेचे ९५% काम पूर्ण झाले आहे. एकूण १० पैकी ६ मलनि:सारण केंद्रे कार्यान्वीत झाली असून मालमत्तेच्या मलनि:सारण जोडणीचे काम प्रगतीपथावर आहे. कार्यान्वीत मलनि:सारण केंद्रांची देखभाल व दुरुस्तीचा वार्षिक खर्च रु. ६.६० कोटी इतका आहे व मलनि:सारण केंद्राकरीता लागणाऱ्या वीजेचा वार्षिक खर्च रु. ९.०० कोटी एवढा आहे. असा एकूण रु. १५.६० कोटी वार्षिक खर्च असून प्रतीवर्षी त्यामध्ये सरासरी १०% वाढ अपेक्षीत आहे. मालमत्तेची मलनि:सारण जोडणी करण्यासाठी शहरातील मुख्य रस्त्यावरील मलवाहिनीपासून प्रत्येक इमारतीच्या प्रवेशद्वारा जवळ मलसंकलन (Sewer Collection) चेंबर बनविण्यात आले आहेत. सदर सुविधा नागरीकांचे राहणीमान उंचावण्यासाठी असल्यामुळे या सुविधेकरीता होणारा वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्च हा शहरातील नागरीकांकडून मलप्रवाह कर स्वरुपात आकारणी करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न अत्यंत कमी असल्याने शासनाकडील योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

त्यामुळे शहरातील ज्या मालमत्तांना मलप्रवाह जोडणीची सुविधा उपलब्ध आहे केवळ अशाच मालमत्तांना ''मलप्रवाह कर'' आकारणे आवश्यक आहे. सबब उक्त तरतुदीनुसार करयोग्य मूल्याच्या ५% ''मलप्रवाह कर'' लागू केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल. ज्या मालमत्ता धारकांना मलप्रवाह जोडणी झाली आहे त्याना १-४-२०१८ पासुन कर आकारणी करावी. व ज्या मालमत्ता धारकांची ऑगस्ट २०१८ मध्ये होणार आहे त्यांना मलप्रवाह एप्रिल २०१९ पासुन लागू करण्यात यावा. तरी याप्रमाणे ''मलप्रवाह कर'' लागू करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**सभापती महोदय मलप्रवाह कर मंजूरी मिळणेबाबत. ह्या विषयी वाकोडे साहेबांनी माहिती द्यावी.**

**सुरेश वाकोडे :-**

**आपण जे सुरुवातीला मलप्रवाह सुविधा कर लावण्यात आली होती. मल:निसारण कर हा इन्फ्रास्ट्रक्चर सिव्हरेज डेव्हलप करण्यासाठी हा कर आहे. आजच्या घडीला ११५ ट्रीट प्लान्ट तयार केले आहेत. फ्युचरमध्ये ४२८ एम.एल.डी. पाणी घेणार आहेत. फ्युचरमध्ये ४२८ एम.एल.डी. पाणी घेणार त्यासाठी ८० टक्के ट्रीटमेन्ट प्लान भविष्यासाठी सिव्हरेजची सिस्टम काही भागामध्ये आहे. उर्वरीत भागामध्ये नाही. त्या भागात सुध्दा आणावी लागणार आहे त्याच्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर कसे उभे करणार. आजची अशी परिस्थिती आहे की एम.एम.आर.डी.ए. कडून लोन घ्यायचे असेल तर आपली पत राहत नाही. असे टॅक्स वाढवत नाही तर आपण सबस्टेन होऊ शकत नी. आपल्याला कर्ज मिळू शकत नाही. आपल्याला विकास करावयाच असेल तर ह्या गोष्टीकडे जावे लागेल. जिथे आपल्याला रहायचे आहे तिथे ह्या गोष्टी करणे क्रमप्राप्त आहेत.**

**जुबेर इनामदार :-**

**सभापती महोदय मिरा भाईंदर शहरामध्ये मलप्रवाह हा ८ टक्के कर लावला आणि आजही ही योजना शहरामध्ये पूर्ण झालेली नाही. पण हा कर अशाप्रकारे १३ टक्केपर्यंत वाढावा हे स्पष्ट होत आहे हा विषय.**

**मा. सभापती :-**

**वाकोडे साहेब मलप्रवाह कर विषयी आपल्याला ही योजना २०१७-१८ आखली त्यानंतर आपले शहर वाढले आहे. आपल्याला पुन्हा ही योजना पुन्हा राबवायची आहे. त्याकरिता पैसे लागणार आहेत. म्हणून तो पैसा ह्या शहरामध्ये ही योजना पूर्ण झाल्यापर्यंत आपल्याला करायचे आहे. आणि मलप्रवाह कर पाच टक्के आपण गृहित धरलेला आहे. ही योजना ८ टक्के लावलेली आहे.**

**सुरेश वाकोडे :-**

**सभापती महोदय मलसुविधा कर १० ते ११ कोटी रुपये, ८ ते ९ कोटी रुपये. आपल्या दहा वर्षात आपल्याला शंभर कोटी रुपये आलेले आहेत. शासनाचे आपल्याला २४० कोटी रुपये आहेत. २३२ कोटी रुपये आपले आहेत.**

**जुबेर इनामदार :-**

**दिलेली माहिती योग्य नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. प्रकरण क्र. ४४ टाईप करणे.**

**अनिता पाटील :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ४४ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी, अनुमोदन श्री. मोहन म्हात्रे. दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्रीम. अनिता पाटील, मतदानासाठी मी दुसरा ठराव पुकारतो आहे. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी नाही.**

**मा. सभापती :-**

**सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ०८, विरोधात ०५ मते पडलेली आहेत. त्यामुळे श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.**

**प्रकरण क्र. ४४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३१(१)(a)(b) नुसार "मलप्रवाह कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.३०)

**ठराव क्र. ४१ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम १३१(१)(a)(b) तरतुदीनुसार ''मलप्रवाह कर'' लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे.

केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम अंतर्गत मिरा भाईंदर शहराकरीता भुयारी गटार योजना मंजूर केली असून या प्रकल्पाचा खर्च रु. ४९१.९६ कोटी आहे. प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून योजनेचे ९५% काम पूर्ण झाले आहे. एकूण १० पैकी ६ मलनि:सारण केंद्रे कार्यान्वीत झाली असून मालमत्तेच्या मलनि:सारण जोडणीचे काम प्रगतीपथावर आहे. कार्यान्वीत मलनि:सारण केंद्रांची देखभाल व दुरुस्तीचा वार्षिक खर्च रु. ६.६० कोटी इतका आहे व मलनि:सारण केंद्राकरीता लागणाऱ्या वीजेचा वार्षिक खर्च रु. ९.०० कोटी एवढा आहे. असा एकूण रु. १५.६० कोटी वार्षिक खर्च असून प्रतीवर्षी त्यामध्ये सरासरी १०% वाढ अपेक्षीत आहे. मालमत्तेची मलनि:सारण जोडणी करण्यासाठी शहरातील मुख्य रस्त्यावरील मलवाहिनीपासून प्रत्येक इमारतीच्या प्रवेशद्वारा जवळ मलसंकलन (Sewer Collection) चेंबर बनविण्यात आले आहेत. सदर सुविधा नागरीकांचे राहणीमान उंचावण्यासाठी असल्यामुळे या सुविधेकरीता होणारा वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्च हा शहरातील नागरीकांकडून मलप्रवाह कर स्वरुपात आकारणी करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न अत्यंत कमी असल्याने शासनाकडील योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

त्यामुळे शहरातील ज्या मालमत्तांना मलप्रवाह जोडणीची सुविधा उपलब्ध आहे केवळ अशाच मालमत्तांना ''मलप्रवाह कर'' आकारणे आवश्यक आहे. सबब उक्त तरतुदीनुसार करयोग्य मूल्याच्या ५% ''मलप्रवाह कर'' लागू केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल. ज्या मालमत्ता धारकांना मलप्रवाह जोडणी झाली आहे त्याना १-४-२०१८ पासुन कर आकारणी करावी. व ज्या मालमत्ता धारकांची ऑगस्ट २०१८ मध्ये होणार आहे त्यांना मलप्रवाह एप्रिल २०१९ पासुन लागू करण्यात यावा. तरी याप्रमाणे ''मलप्रवाह कर'' लागू करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | निरंक |
| २ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | २ | श्रीम. वंदना विकास पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | ३ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ४ | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | ४ | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | |
| ५ | श्रीम. रावल मेघना दिपक | ५ | श्री. जुबेर इनामदार | |
| ६ | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ७ | श्री. विरानी अनिल रावजीभाई | | | |
| ८ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

ठराव बहुमताने मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ४५,** मालमत्ता कर आकारणी करीता भाडेमुल्याचे वाढीव दरास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.३२)

**अनिल विराणी :-**

सदरचा विषय पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

सर माझे असे निवेदन होते की सब्जेक्ट आला आहे पण गोषवारा आला नाही. मागील वेळी जो गोषवारा दिला होता तोच गोषवारा कायम ठेवला आहे.

**मा. सभापती :-**

मॅडम ह्या विषयावरती सविस्तर चर्चा करणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

सभापती महोदय हा विषय परत आलेला आहे. संपूर्ण सर्वेक्षण करा शहराचे किती मालमत्ता आहे. वाणिज्य किती, रहिवास किती, तुमचे ॲक्च्युअल डिमांड किंती आणि तुमचा डिमांड फिक्स नाही झालेला आहे. आणि दरवर्षी ह्या विषयावरती चर्चा अर्थ संकल्पाच्या बैठकीमध्ये नेहमीच होत असते. किंवा महासभेमध्ये सुध्दा झाली तशी तुम्ही सविस्तर माहिती द्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

पुढच्या स्टॅन्डिंग मिटींगमध्ये घेण्यात येईल.

**मा. सभापती :-**

मॅडम कोणत्या वर्षी वाढ झाली. किती टक्के वाढ झाली आणि किती वर्षे झाली. साधारणपणे हा टॅक्स लावल्यानंतर ह्यामध्ये व्हॅल्यु किती वाढली, मार्केटची कंडीशन काय ह्या सर्व बाबींचा उल्लेख गोषवाऱ्यामध्ये आला पाहिजे. म्हणजे नगरपरिषद काळापासून ते महापालिका आतापर्यंतचे द्यायचे आहेत.

**सुरेश खंडेलवाल :-**

सर त्याच्यामध्ये प्रॉपर्टीची डिटेल पण द्या.

**मा. सभापती :-**

विषय असा आहे की संपूर्ण महानगरपालिकेचा पण आढावा घेऊ इतर महानगरपालिकेची परिस्थिती काय आपली परिस्थिती काय आहे. हा टॅक्स नगरपरिषदेच्या काळामध्ये किती होता. कालखंड किती होता. महानगरपालिका २००२ मध्ये झाली. २००२ पासून ते २०१७ पर्यंत ह्याच्यामध्ये किती वाढ झाली होती. वाढ प्रोपोज किती होती. ठराव पास झाला होता का असा सविस्तर गोषवारा द्या.

**प्रकरण क्र. ४५ :-**

मालमत्ता कर आकारणी करीता भाडेमुल्याचे वाढीव दरास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.३२)

**ठराव क्र. ४२ :-**

सदरचा विषय पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ४६,** पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (आस्थापना विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.४१)

**सुरेश खंडेलवाल :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचायांचे सन २०१७-१८अंदाजपत्रकानुसार तरतुदी करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचायांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार केलेल्या तरतुदीप्रमाणे वैद्यकीय विभाग (स्थायी) तसेच स्मशान भुमी, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, सार्व. बांधकाम विभाग, संगणक विभाग या विभागासाठी करण्यात आलेली तरतुद अपूरी पडत असल्यामुळे सदर बाब मा. महासभेपुढे सादर करून पूनर्विनियोजन प्रस्ताव मान्येतेसाठी घेण्यास शिफारस करीत आहे, असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**मा. सभापती :-**

पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत. हा ठराव पेन्डींग आहे. महासभेमध्ये घेण्यात येईल. ह्याच्यामध्ये सामान्य प्रशासन विभाग ह्याचा झालेला खर्च, सार्व. आरोग्य विभाग व बांधकाम विभाग, वैद्यकिय विभाग, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग हे सर्व महासभेमध्ये घ्यायचे आहेत.

**प्रकरण क्र. ४६ :-**

पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (आस्थापना विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.४१)

**ठराव क्र. ४३ :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचायांचे सन २०१७-१८अंदाजपत्रकानुसार तरतुदी करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचायांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार केलेल्या तरतुदीप्रमाणे वैद्यकीय विभाग (स्थायी) तसेच स्मशान भुमी, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, सार्व. बांधकाम विभाग, संगणक विभाग या विभागासाठी करण्यात आलेली तरतुद अपूरी पडत असल्यामुळे सदर बाब मा. महासभेपुढे सादर करून पूनर्विनियोजन प्रस्ताव मान्येतेसाठी घेण्यास शिफारस करीत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी
ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ४७,** भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात ठोक मानधनावर कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी तसेच बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांच्या सेवेच्या कालावधीस नव्याने नियुक्ती करणेबाबत.

**मेघना रावल :-**

सदरचा विषय पुरक माहितीसह पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

जुबेर इनामदार :-

नव्याने नियुक्ती आरोग्य विभागाचे कोणी नसेल नव्याने नियुक्ती करण्याबाबत दिले आहे. त्याला तुम्ही ब्रेक दिलेला आहे का आता.

मा. सभापती :-

त्यांची सेवा चालू आहे. १६ ऑगस्टला त्यांनी मुदत संपलेली होती पण सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर त्यांची सेवा चालू आहे. त्यांची व्यवस्थित माहिती नसल्यामुळे आणि त्यांचे अधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्यांची माहिती पुढच्या मिटींगमध्ये घेऊ.

जुबेर इनामदार :-

ह्याचा परिणाम सेवेवर पडू नये.

प्रकरण क्र. ४७ :-

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात ठोक मानधनावर कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी तसेच बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांच्या सेवेच्या कालावधीस नव्याने नियुक्ती करणेबाबत.

ठराव क्र. ४४ :-

सदरचा विषय पुरक माहितीसह पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. मेघना रावल अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४८, स्व. पंडित भिमसेन जोशी रुग्णालयात ठोक मानधनावर कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी यांना सहा महिन्यांसाठी नव्याने नियुक्ती करणेबाबत.

अनिल विराणी :-

सदरचा विषय पुरक माहितीसह पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

अशोक तिवारी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रशांत दळवी :-

सभापती महोदय अनु.क्र. ४७,४८ कर्मचारी नियुक्तीबाबत. ठराव होतो. सभापती महोदय मला असे विचारायचे आहे की ठोक मानधनावरती इंजिनिअर घेणार होते ते आपण का घेत नाही. काय कारण आहे त्यांना आपली मागणी आहे. आपल्याकडे इंजिनिअर नाहीत. त्याबाबतीत प्रशासनाचे काय मत आहे.

स्वाती देशपांडे :-

टेंडर काढलेले आहे.

प्रशांत दळवी :-

गेल्या तीन वर्षापासून चालू आहे. नविन थोडी आहे. त्याबाबतीत प्रशासन काय करतो.

स्वाती देशपांडे :-

टेंडर काढले आहे आणि ते झालेले आहे. येत्या १० ते १५ दिवसात होऊन जाईल.

सुरेश खंडेलवाल :-

सभापती साहेब महासभेमध्ये आम्ही मुदतवाढीचा कारण की टेंडर प्रोसेस वगैरे होत नाही. आम्ही महासभेमध्ये ठराव केला होता. सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात आली म्हणून ते पण इम्पलीमेन्ट केला नाही. साहेब आजच्या परिस्थितीमध्ये प्रत्येक प्रभागामध्ये किंवा बांधकामामध्ये सर्व ठिकाणी इंजिनियरची एवढी गरज आहे का काही पण केले तरी इंजिनिअर नाही आपण मा. महासभेमध्ये केलेल्या ठरावामध्ये सुध्दा काही ॲक्शन घेत नाही. का घेतले नाही ०४ इंजिनिअर? महासभेमध्ये ०४ इंजिनियरचा आम्ही ठराव केला होता की त्यांना तुम्ही मुदतवाढ द्या बाकीचे ०२ इंजिनियर कोर्टात गेले त्यामुळे त्यांना आम्ही मुदतवाढ दिली नव्हती. ते का दिले नव्हते?

स्वाती देशपांडे :-

त्यांनी आधीच बडतर्फ केल होते.

सुरेश खंडेलवाल :-

सभापती साहेब तो प्रशासनानी गोषवारा दिला होता.

अनिल विराणी :-

किती नंबरसाठी किती इंजिनिअर आहेत एकूण.

स्वाती देशपांडे :-

एकूण ४३ इंजिनिअर आहेत.

प्रकरण क्र. ४८ :-

स्व. पंडित भिमसेन जोशी रुग्णालयात ठोक मानधनावर कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी यांना सहा महिन्यांसाठी नव्याने नियुक्ती करणेबाबत.

ठराव क्र. ४५ :-

सदरचा विषय पुरक माहितीसह पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४९, लेखापरिक्षण विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नेमलेल्या श्री. मधुकर सुर्वे (लेखाधिकारी) व श्री. प्रभाकर वर्तक (सहा. लेखाधिकारी) यांना ०६ महिन्यांसाठी नव्याने नेमणूक करणेबाबत.

सुरेश खंडेलवाल :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लेखापरीक्षण विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर श्री. मधुकर सुर्वे (लेखाधिकारी) व श्री. प्रभाकर वर्तक (सहा.लेखाधिकारी) यांची दि.०४/०१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये नेमणूक करण्यात आली होती. त्यांची सेवा दि.०४/०१/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने लेखापरीक्षण विभागाने महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून कामे करून घ्यावीत. व आवश्यकता वाटल्यास नविन अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

जुबेर इनामदार :-

सभापती महोदय मला तांत्रिक माहिती पाहिजे होती की किती महिन्यांसाठी मुदतवाढ होऊ शकते.

मा. सभापती :-

कलम ५३(३) अन्वये आपण फक्त ६ महिन्यांकरिता मुदतवाढ देऊ शकतो. पण जी.आर. असा आहे शासनाचा की विविक्षीत कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात ठेवून ते काम पूर्ण करण्याचा कालावधी संबंधित विभागाने निश्चित करावा आणि सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळेत जास्तीत जास्त एका वर्षासाठी घेण्यात यावी. परंतु अशा वाढीकरिता दरवर्षी नुतनीकरण करण्यांत येईल आणि एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही असा जी.आर. आहे. जी.आर मध्ये एक वर्ष आहे. सेक्शन पध्दतीने तीन महिने किंवा सहा महिने देण्यांत येते. विविक्षित कामाचे स्वरुप पाहता म्हणजे एखादे काम करायचे आहे तर त्याच्यासाठी आपल्याला एखादा माणून पाहिजे असेल तर त्याचे करारनामा करुन आपण तीन वर्षासाठी घेवू शकतो. आणि त्याची प्रत्येक वर्षी नुतनीकरण करतो रेग्युलर कामासाठी आपल्याला एक माणूस पाहिजे. आपण ते घेतो. ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ४९ :-

लेखापरिक्षण विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नेमलेल्या श्री. मधुकर सुर्वे (लेखाधिकारी) व श्री. प्रभाकर वर्तक (सहा. लेखाधिकारी) यांना ०६ महिन्यांसाठी नव्याने नेमणूक करणेबाबत.

ठराव क्र. ४६ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लेखापरीक्षण विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर श्री. मधुकर सुर्वे (लेखाधिकारी) व श्री. प्रभाकर वर्तक (सहा.लेखाधिकारी) यांची दि.०४/०१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये नेमणूक करण्यात आली होती. त्यांची सेवा दि.०४/०१/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने

**लेखापरीक्षण विभागाने महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून कामे करून घ्यावीत. व आवश्यकता वाटल्यास नविन अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ५०,** श्री. किशोर देशमुख (सेवानिवृत्त) उपअभियंता (यांत्रिकी) या पदावर सेवाकरार पदध्दतीने नियुक्तीचे नुतनीकरण करणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कामकाजाचा वाढता व्याप व कामाची निकड लक्षात घेता, उप-अभियंता यांत्रिकी यांची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे, शासन निर्णस क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.०८/०१/२०१६ महानगरपालिका प्रशासनाने विहित निवड प्रक्रिया अवलंब करुन श्री. किशोर दे. देशमुख यांची दि.१७/१०/२०१६ रोजीच्या आदेशान्वये उप-अभियंता (यांत्रिकी) या पदावर रु.४०,०००/- या निव्वळ ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने दि.१७/०६/२०१६ पासून प्रथमतः एका वर्षाच्या कालावधीसाठी ९ अटीशर्तीनुसार नेमणूक करण्यात आली होती. त्याअनुषंगाने श्री. किशोर दे. देशमुख यांचे दि.१९/०६/२०१७ रोजी मुदत संपुष्टात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी पाणी पुरवठा विभागातर्फे MIDC कडुन मिळणाया ७५ द.ल.ली.पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे, भुयारी गटाराचे काम पुर्णत्वात आले आहे. सदर दोन्ही कामावर विद्युत व यांत्रिकी कामाचा मोठा हिस्सा असल्याने उप-अभियंता (यांत्रिक) या पदाची आवश्यकता असल्याचे कळविले आहे.

सबब, पाणी पुरवठा विभागातील वाढता व्याप व कामाची निकड लक्षात घेता उप-अभियंता (यांत्रिक) श्री. किशोर दे. देशमुख यांना दि.१७/०६/२०१७ रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.१९/०६/२०१७ ते दि. ३०/१२/२०१७ पर्यंत कार्योत्तर मंजूरी व दि.३०/१२/२०१७ ते दि.१८/०६/२०१८ पर्यंत ६ महिन्यांकरीता नव्याने नुतनीकरण करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

**मिरादेवी यादव :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. सभापती :-**

**ठराव मंजूर.**

**प्रकरण क्र. ५० :-**

श्री. किशोर देशमुख (सेवानिवृत्त) उपअभियंता (यांत्रिकी) या पदावर सेवाकरार पदध्दतीने नियुक्तीचे नुतनीकरण करणेबाबत

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कामकाजाचा वाढता व्याप व कामाची निकड लक्षात घेता, उप-अभियंता यांत्रिकी यांची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे, शासन निर्णस क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.०८/०१/२०१६ महानगरपालिका प्रशासनाने विहित निवड प्रक्रिया अवलंब करुन श्री. किशोर दे. देशमुख यांची दि.१७/१०/२०१६ रोजीच्या आदेशान्वये उप-अभियंता (यांत्रिकी) या पदावर रु.४०,०००/- या निव्वळ ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने दि.१७/०६/२०१६ पासून प्रथमतः एका वर्षाच्या कालावधीसाठी ९ अटीशर्तीनुसार नेमणूक करण्यात आली होती. त्याअनुषंगाने श्री. किशोर दे. देशमुख यांचे दि.१९/०६/२०१७ रोजी मुदत संपुष्टात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी पाणी पुरवठा विभागातर्फे MIDC कडुन मिळणाया ७५ द.ल.ली.पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे, भुयारी गटाराचे काम पुर्णत्वात आले आहे. सदर दोन्ही कामावर विद्युत व यांत्रिकी कामाचा मोठा हिस्सा असल्याने उप-अभियंता (यांत्रिक) या पदाची आवश्यकता असल्याचे कळविले आहे.

सबब, पाणी पुरवठा विभागातील वाढता व्याप व कामाची निकड लक्षात घेता उप-अभियंता (यांत्रिक) श्री. किशोर दे. देशमुख यांना दि.१७/०६/२०१७ रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.१९/०६/२०१७ ते दि. ३०/१२/२०१७ पर्यंत कार्योत्तर मंजूरी व दि.३०/१२/२०१७ ते दि.१८/०६/२०१८ पर्यंत ६ महिन्यांकरीता नव्याने नुतनीकरण करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

**प्रकरण क्र. ५१,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४८ क नुसार "रस्ता कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रशांत दळवी :-

सभापती महोदय प्रकरण क्र. ५१,५२ आणि ५३ हे सचिव साहेब फेरसादर करावे.

जुबेर इनामदार :-

सभापती महोदय पुर्नविनियोजनाचा विषय होता आणि स्थायी समितीमध्ये सातत्याने त्या विषयावरती चर्चा केली गेली आहे. प्रभागात नगरसेवक निधी खरतर अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. त्यीच गरज नाही पुर्नविनियोजनाची. जी तरतूद केली तेवढी तरी काम करायला सांगा. कार्यकारी अभियंता उपस्थित आहेत माझी तुम्हाला विनंती आहे की ह्या विषयावर काय निर्णय घेतले प्रशासनाने आता वर्ष संपायला आले.

मा. सभापती :-

नगरसेवक निधी, प्रभाग निधी ह्यांचे सहा महिन्यामध्ये एकही काम झाले नाही.

सुरेश खंडेलवाल :-

आयुक्तांकडे आपण असा प्रस्ताव सादर केला होता का? नगरसेवक निधी आणि प्रभाग निधीच आपण सोबत निवडून आलोत तेव्हापासून हे चालू आहे. विषय असा आहे की आपल्याकडे ४ कोटीची तरतूद आहे. तिथे ५० लाखापर्यंत घेतले इथे आपल्या सर्वांच्या मागाला आहेत. तर कमिशनर ह्याच्यामध्ये बाळासाहेब ठाकरे आणि नाल्याचे आपण ७ कोटीची तरतूद केली आहे. तरी साडे तीन कोटी रुपये आहेत.

जुबेर इनामदार :-

नगरसेवक निधी, प्रभाग निधी अर्थसंकल्पात तरतूद करण्यांत आलेली आहे. त्याच्यानंतर तरतूदीची गरज नाही तो पैसा असणारच नाही. तरतूद करण्यात आली म्हणजे तो अर्थसंकल्पाचा विषय आहे.

मा. सभापती :-

आपण ज्यावेळी काम प्रस्तावित करतो. ऑक्टोबरमध्ये आपण काम प्रस्तावित केली आपण फेब्रुवारी मार्चमध्ये काम करतो. त्याचे बील येते नेक्स्ट ईयरमध्ये.

जुबेर इनामदार :-

तशी जरी अडीअडचण असली तरी स्थायी समितीसमोर आणावी. आणि पुर्नविनियोजनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देऊ.

दिपक खांबित :-

त्याच्या अगोदरच टेंडर काढलेले होते त्याची प्रोसीजर व्हायला दोन महिने तरी लागतात.

जुबेर इनामदार :-

साहेब १५ लाख किंवा ३० लाखाची तुमची काम असतील नगरसेवक निधी प्रभाग निधीची त्याला तुम्हाला १५ दिवसांचा अवधी लागतो का?

दिपक खांबित :-

दोनशे इस्टीमेट करायला दोन महिने लागतील.

जुबेर इनामदार :-

प्रशासनाने आमची तरी भूमिका ऐकावी.

सुरेश खंडेलवाल :-

साहेब ह्या वर्षाची आणि पुढच्या वर्षाची एकदाच तरतूद करु कारण की आता पण तसेच होणार आहे.

मा. सभापती :-

ह्या वेळी वसूली खूप कमी आहे.

जुबेर इनामदार :-

नगरसेवकांचा तो व्यक्तीगत अधिकार आहे. नगरसेवकनिधीची तर काम करा. प्रभागचा नाही केला तरी चालेल. काही तरी एक स्कीम करा.

मा. सभापती :-

निर्णय घेऊन टाका.

तारा घरत :-

सभापती साहेब गोल्डन नेस्टला खोदलेले आहे. एक साईट खोदलेला आणि एक साईट रस्ता खराब आहे. त्याच्यामुळे लोकांना प्रॉब्लेम होत आहे.

दिपक खांबित :-

पाईप लाईन शिफ्ट करायची आहे.

सुरेश खंडेलवाल :-

वाकोडे साहेब भाईंदर पश्चिम ते पोलीस चौकीचा हा सी.सी. रोड नाही झालेला आहे. आपण पाण्याची लाईनचे शिफ्टींग करत नाही म्हणून तो थांबला आहे.

सुरेश वाकोडे :-

टेंडरचा इश्यू झालेला आहे.

सुरेश खंडेलवाल :-

तो कधीपर्यंत होईल. ८-१० दिवसात होईल ना. विषय असा होता की भाईंदर पश्चिमचा जो रोड आहे तो तिकडचा ऑलरेडी झालेला आहे. फक्त पाण्याची लाईन शिफ्ट होत नाही म्हणून तो रोडचे काम चालू होत नाही. म्हणून माझे निवेदन आहे की शिफ्टींगचे काम लवकरात लवकर करण्यांत यावे.

अनिता पाटील :-

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते, वाकोडे साहेब माझ्या वॉर्डात ऑलरेडी लाईन शिफ्टींग करुन टाकण्यात आलेले आहेत. दोन महिने झालेले आहेत. तिथे लोकांना चालायला खूप त्रास होत आहे. कारण ते नियुक्ती झाली आहे. अति उंच भाग आणि अति सखल भाग तिथेच आपण खोदकाम करुन पाईप लाईन टाकलेली आहे. पाईप लाईन टाकून पूर्ण काम झालेले आहे. ते जरा सी.सी. करुन टाकले तर बर होईल.

मिरादेवी यादव :-

सभापती साहेब गंभीर विषय है। डाचकुलपाडा में बांधकाम विभागने पाईप लाईन डाली है और बारीश से रस्ते पे खड्डे हुए है। और दुसरा निल कमल से उधर भी है।

मा. सभापती :-

५१,५२,५३ हे तिन्ही विषय पुढील सभेत फेरसादर करा.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५४, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निवीदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग), प्रकरण क्र. ५५, माहे जुलै-२०१७ ते सप्टेंबर-२०१७ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत.

जुबेर इनामदार :-

मंजुरी देता की पुढे घेणार.

मा. सभापती :-

माघारी घेतला आहे.

सुरेश खंडेलवाल :-

सभापती साहेब अवलोकनामध्ये जर कोणाला अडचण असेल किंवा कोणाचे सजेशन असेल तर देऊ शकतो का?

जुबेर इनामदार :-

वसुली जमामध्ये एक मात्र आमच्याकडे उत्पन्नाचा स्तोत्र सर्वसाधारण कर शंभर कोटी रुपये मॅडम अपेक्षित होते पण फक्त ३३ कोटी रुपये जमा झाले आणि ६६ कोटी रुपये यायचे बाकी आहेत. सप्टेंबर २०१७ पर्यंज आजच्या तारखेमध्ये थोडा फार फरक पडला असेल. किती टक्के काढले आहे?

स्वाती देशपांडे :-

सामान्य कराचे टोटल ८५ कोटी रुपये वसुली झालेली आहे.

जुबेर इनामदार :-

५० टक्के बाकी आहे. तीन महिन्यामध्ये तुम्हाला करायचे आहे. मोकळ्या जागेवरचे तुमच्याकडे माहिती नाही. मोठा विषय म्हणजे स्थानिक संस्था कर अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली २१२ कोटी रुपये होती. आणि आपल्याकडे आतापर्यंत अपेक्षित जमा ६० कोटी सप्टेंबरपर्यंत झालेली आहे. १५० कोटी रुपये येणे बाकी आहे.

सुरेश खंडेलवाल :-

दर महिन्याला आपल्याला १९ कोटी रुपये मिळते. याच्यामध्ये माझी सुचना अशी आहे आपण जर प्रत्येक हेडमध्ये बघितली टाऊन प्लानिंग डिपार्टमेंट, नगररचना विभागाची जी वसुली आहे. प्रत्येक हेडमध्ये जर बघितली साहेब सहा महिन्यामध्ये जी वसुली आहे ती मला वाटते २५ ते ३० टक्केपेक्षा जास्त नाही. आणि ऊरलेल्या सहा महिन्यामध्ये ७०-८० टक्के वसुली होईल नाही होईल हा जो विषय आहे तो विचार करुनच पुढच्या बजेटमध्ये ठेवायचे आहे.

जुबेर इनामदार :-

सभापती महोदय आढावा बैठक घ्या. अर्थसंकल्प तयार करायचे आहे.

मा. सभापती :-

फेब्रुवारीमध्ये आपला बजेट फायनल करा.

सुरेश खंडेलवाल :-

मेरी एक सुचना ऐसी है की आज का गंभीर विषय हुआ मॅडम की जो स्ट्राईक है जो आर.जी. सर्वेक्षण और आज सब लोगोने स्ट्राईक किया है उससे हमारा जो रँक उपर गया है। मुझे लगता है की काफी फरक

पडेगा और वो फरक जितना कमिशनर साहब कर रहे वो स्वच्छ सर्वेक्षण में डिल हो जाएगा। कमिशनर साहबने स्वच्छ सर्वेक्षण के लिए इतना मेहनत करके सब डील होनेवाला है। स्ट्राईक के लिए जल्दी से जल्दी जो भी है वो नक्स्ट टाईम ऐसा...........

**मा. सभापती :-**

**अवलोकन मंजूर.**

**प्रकरण क्र. ५४ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निवीदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग),

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील करावयाच्या खालील कामांना मूजूरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र | ामाचे नाव | अंदाजित खर्च | ठे दाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २१ मधील बाकोळ स्ट्रीट येथील अमिधारा बिल्डींग ते राजलक्ष्मी बिल्डींग पर्यतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे (नगरसेवक निधी) | रू.१४,९४,०००/- | मे. एस.एम. कन्स्ट्रक्शन | ४.०००० % कमी दराने |
| २. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर जंक्शन येथे वाहतूक नियंत्रित करणेकामी आवश्यक ती उपाययोजना करणे | रू.१६,५२,१८१/- | मे. युटीलीटी इंटरप्राईजेस | ४.०० % कमी दराने |
| ३. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७, मधील श्रीराम मंदिर, मुर्धा येथे नवीन रंगमंच बांधणे **(खासदार निधी)** | रु.२५,००,०००/- | मे. गुरूजी इन्फ्रा. प्रा.लि. | ३.७० % कमी दराने |
| ४. | मिरारोड (पुर्व) नयानगर लोढा रस्त्यावरील निदा पार्क इमारत ते नरेंद्र पार्क डी-1 इमारतीपर्यंत नवीन सीसी गटर बांधून स्लॅब् टाकणे | रु.24,44,500/- | मे. मुस्कान इंटरप्राईजेस | ४.०० % कमी दराने |
| ५. | मिरारोड (पुर्व) नयानगर येथील सनराज इमारत क्र. 2 को.ऑ.हौ.सो. ते कुणाल शॉपिंग सेंटर पर्यंत नवीन सीसी गटर बांधून स्लॅब टाकणे | रु.13,77,000/- | मे. मुस्कान इंटरप्राईजेस | ४.०० % कमी दराने |
| ६. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमी / दफनभूमी येथील विद्युत विषयक कामे वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे | रु.१०,६४,८००/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल | ४.००% कमी दराने |
| ७. | मिरा-भाईंदर महानगरपालिका मधील उद्याने व तलाव येथील विद्युत विषयक कामे वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे | रु.१९,९६,५००/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल | ४.००% कमी दराने |
| ८. | मिरा-भाईंदर महानगरपालिका मधील मुख्य कार्यालय, सार्व. इमारती, प्रभाग कार्यालये, विभागीय कार्यालय व समाज मंदिरे येथील विद्युत विषयक कामे वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे | रु.१५,९७,२००/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल | ४.००% कमी दराने |
| ९. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पुनम गार्डन येथील सुविधा क्षेत्र भूखंड येथील विरंगुळा केंद्र, अभ्यासिका व | रु.१२,८३,९९०/- | मे. मिरॅकल इंलेक्ट्रीक्लस सोल्युशन प्रा.लि. | बी-२ दर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यालय इमारतीमधील विद्युत विषयक कामे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे | | | |
| १०. | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य कार्यालय, प्रभाग कार्यालय, विभागीय कार्यालये, वाचनालय, अभ्यासिका, ई-लायबरी, हॉस्पिटल, मा. आयुक्त, मा. महापौर इत्यादी ठिकाणी वातानुकुलीत यंत्रे वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे.** | **रु.१६,५०,०००/-** | **मे. युटीलिटी इंटरप्रायझेस** | **बी-२ दर** |
| ११. | **मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत, टेंभा हॉस्पीटल, प्रभाग कार्यालय क्र. २, मिरारोड हॉस्पीटल इ. ठिकाणचे EPBX व Intercome System वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे.** | **रु.१७,००,०००/-** | **मे. प्रिल्युड नेटकॉम्स** | **बी-२ दर** |
| १२. | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रा.म.क्र.०८ वरील लोढा रेंटल हाऊसींग स्किम मधील उद्वाहक वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे.** | **रु.१६,५०,०००/-** | **मे. मिरॅकल इंलेक्ट्रीक्लस सोल्युशन प्रा.लि.** | **बी-२ दर** |
| १३. | भाईंदर (पुर्व) गॅस गोडाऊन गल्ली येथील गटारावर स्लॅब टाकणे | रू.14,87,400 /- | **मे. दुर्गेश कन्स्ट्रक्शन** | **१५.७२००% कमी दराने** |
| १४. | काशिमिरा येथील दफनभूमीची विकास कामे करून सुशोभीकरण करणे | रू.25,00,000 /- | **मे. दुर्गेश कन्स्ट्रक्शन** | **१०.५७००% कमी दराने** |
| १५. | रा.म. क्र. 8 सर्व्हिस रस्ता ते जया आर.एम.सी. प्लान्ट पर्यंत गटार बनविणे | रू.24,88,100/- | **मे. व्ही. के. इंटरप्राईजेस** | **१४.५५००% कमी दराने** |
| १६. | मिरारोड (पू.) शांती नगर सेक्टर नं.१० मधील अंतर्गत व बाहेरील सर्व गटारांतील चेकर्ड लादी व कर्बस्टोन पुरविणे व बसविणे (महापौर निधी) | **रु.२४,०३,३००/-** | **मे. श्री गणेश इंटरप्रायजेस** | **३.७०% कमी दराने** |
| १७. | मिरारोड (पू.) शांती नगर सेक्टर नं.१० मैदानाचे सुशोभिकरण करणे आणि इमारत क्र. सी-६०,६१ जवळील शेडमध्ये कोटा लादी बसवून बंदीस्त करणे. (महापौर निधी) | **रु.२३,२२,५००/-** | **मे. श्री गणेश इंटरप्रायजेस** | **३.७०% कमी दराने** |
| १८. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.192/193 येथील हॉस्पिटल इमारतीमधील शवागृहातील शितपेट्या त्रैवार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे | **रु.१२,३५,०००/-** | **मे. युटीलिटी इंटरप्रायझेस** | **बी-२ दर** |
| १९. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रा.म.क्र.08 वरील वर्सोवा जंक्शन, वेस्टर्न हॉटेल जंक्शन, काशीमिरा जंक्शन, प्रसाद हॉटेल जंक्शन, सागर हॉटेल जंक्शन इ. ठिकाणी सिग्नल यंत्रणा वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु.११,९२,४००/- | **मे. युटीलिटी इंटरप्रायझेस** | **बी-२ दर** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) बंदरवाडी स्मशानभूमी येथील Air Exhaust System वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु.२३,१६,१२५/- | **मे. मिरॅकल इंलेक्ट्रीक्लस सोल्युशन प्रा.लि.** | **बी-२ दर** |
| २१. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणचे सौर ऊर्जा दिवे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु.१५,३१,२०३/- | **मे. मिरॅकल इंलेक्ट्रीक्लस सोल्युशन प्रा.लि.** | **बी-२ दर** |
| २२. | भाईंदर (प.) येथील गणेश देवल नगर आरोग्य केंद्राची पुर्न:बांधणी करणे. **(फेर निविदा)** | रू.15,34,900/- | मे. आयुषी इंटरप्राईजेस | **२.००००% कमी दराने** |
| २३. | भाईंदर (प.) उत्तन डंपिंग ग्राऊंड येथे गटाराचे बांधकाम करणे | रु.20,81,650/- | मे. व्ही. अरविंद इंटरप्राईजेस | **१२.५०% कमी दराने** |

**वरील कामांच्या निविदांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ (ड) अन्वये अवलोकन करण्यात आले.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ५५ :-**

माहे जुलै-२०१७ ते सप्टेंबर-२०१७ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत.

**ठराव क्र. ४९ :-**

**सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील माहे जुलै २०१७ ते सप्टेंबर २०१७ त्रैमासिक जमा/खर्च तसेच आग सुरक्षा निधी जमा/खर्च अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर अवलोकनाकरीता सादर करण्यात आलेला आहे.**

**सदरच्या स्थायी समितीमध्ये माहे जुलै २०१७ ते सप्टेंबर २०१७ त्रैमासिक जमा/खर्च तसेच आग सुरक्षा निधी जमा/खर्चाचे अवलोकन करण्यात आले.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

**सर्व सदस्यांनी खेळीमेळीच्या वातावरणात सभा संपन्न केल्याने धन्यवाद आणि आपणा सर्वांना खिसमसच्या हार्दिक शुभेच्छा! आणि ॲडव्हान्समध्ये नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. सभा संपली असे मी जाहिर करतो.**

**(सभा संपल्याची वेळ दु. १२.३० वाजता)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका